MHSO100009492022

<u>नि.दि.दा.क्र.३७/२०२२ मधील नि.क्र.६२ खालील आदेश</u>.

प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–६, नियम–१७ प्रमाणे वादी क्र.१अ सोनाबाई तुकाराम सुळ ही मयत झाल्यामुळे तिच्या नावासमोर मयत असे लिहिण्यास व तिचे नाव वादींचे शिर्षकामधून कमी करण्याबाबत दुरुस्तीसाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, दाव्याचे कामकाज चालू असताना वादी तुकाराम हा मयत झाला व त्याचे वारस अभिलेखावर वादीने आणताना वादी क्र.१अ श्रीमती सोनाबाई तुकाराम सुळ ही ता.०१.०५.२०१८ रोजी मयत झालेली असताना तिचे नाव अभिलेखावर घेतले आहे. त्यामुळे मयत वादी क्र.१अ सोनाबाई तुकाराम सुळ हिचे नाव सरनाम्यातून कमी करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास वादीला निर्देश देणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, मुळ वादी तुकाराम बापू सुळ हा मयत असून त्याचे वारस वादींनी अभिलेखावर आणले आहेत. त्यामध्ये मुळ वादी तुकाराम याची पत्नी वादी क्र.१अ सोनाबाई तुकाराम सुळ ही नंतर मयत झाली आहे. परंतु तिचे वारस वादी क्र.१ब, १क, १ड, १इ, १ई, १फ, १ग, १घ१, १घ२, १घ३, १च, १छ हे अगोदरच अभिलेखावर घेतले आहेत. त्यामुळे वादी क्र.१अ सोनाबाई तुकाराम सुळ हिचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे. तिला आणखी

कोणीही वारस नाहीत.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहेः–

| अ.क्र. | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबतः–**

४. मी प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.मदने व वादींतर्फे विद्वान वकील श्री.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. वादी क्र.१अ ही ता.०१.०५.२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी क्र.१अ हिचे वारस अगोदरच अभिलेखावर असल्याचे दिसुन येते. वादी क्र.१अ हा मयत झाल्यामुळे तिच्या नावासमोर मयत लिहिण्यास व त्याचे नाव शिर्षकामधून कमी करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होत नाही, त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**नि.क्र.६२ खालील आदेश.**

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा नि.क्र.६२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.02.24 17:08:35 +0530

दि.२४.०२.२०२६. (सोपान द.घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,

माळशिरस.

**नि.क्र.६२ खालील आदेश.**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२४.०२.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२४.०२.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२४.०२.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२४.०२.२०२६.

स्वाक्षरित/–

(श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.